**File No.SMC-31/22/2021-SMC-HEALTH**

**सोलापूर महानगरपालिका,**

**जा.क्र.सआस/कक्ष-1/आस्था-2/** 26
**सामान्य प्रशासन विभाग**
**सोलापूर दि**23**/04/2021**

**-: जाहिर प्रसिध्दीकरण :-**

**अर्ज करण्याचा दिनांक :-24/04/2021**
**अर्ज स्विकारण्याची वेळ :- सकाळी 10.00 ते दु.- 01.00**
**स्थळ:- सोलापूर महानगरपालिका, सामान्य प्रशासन विभाग**

सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत आरोग्य विभागाकडील रुग्णालयाकरीता दरमहा एकवट मानधनावर खालील पद हंगामी स्वरुपात 6 महिने कालावधी करीता भरावयाचे आहे. सदर पदाचे पदनांम, पदसंख्या शैक्षणिक अर्हता, एकवट मानधन शर्ती व अटी, अर्ज स्विकारण्याचे ठिकाण याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | आवश्यक शैक्षणिक अर्हता | भरावयाची पद संख्या | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| 1 | इसिजी टेक्नीशियन ECG Technician | उच्च माध्यमिक शालांत परिक्षा (विज्ञान शाखा) उत्तीर्ण, मान्यताप्राप्त संस्थेकडील इसिजी टेक्नीशियन कोर्स उत्तीर्ण | 1 | 17,000/- |

**<u>अटी व शर्ती :-</u>**

1. सदर सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत Covid care center येथे covid-19 चे कामकाज करणे बंधनकारक असेल
2. इच्छुक उमेदवारांचे अर्ज दि.24/04/2021 रोजी दुपारी 01.00 वाजेपर्यंत सामान्य प्रशासन विभाग, सोलापूर महानगरपालिका, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन, सोलापूर येथे स्विकारण्यात येतील.
3. सदर पदासाठीच्या अर्जाचा नमुना www.solapurcorporation.gov.in यामध्ये Recruitment Notices याममधून download करावा.
4. वयोमर्यादा :- कमाल वयोमर्यादा 43 पेक्षा अधिक नसावी.
5. उमेदवाराने सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्ये पदाचे नांव स्पष्ट नमूद करावे. तसेच खाडाखोड अथवा अवाचनिय अर्ज सादर करु नये अन्यथा संबंधित उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरला जाणार नाही.
6. कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
7. सदरची पदे तात्पुरत्या स्वरुपात असून, करार पध्दतीने सहा महिन्याच्या कालावधीकरीता भरण्यात येणार आहेत.
8. पदासमोर नमूद मानधन असुन, त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत.
9. प्राप्त अर्जावरुन व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करताना Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण, उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभवाचे गुणाची एकत्रित बेरीज करुन एकूण गुणाच्या आधारे मेरीट लिस्ट तयार करण्यात येऊन संबंधित पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.
10. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
11. शासकीय सेवेत नियमित सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबावत उमेदवारांना

कुठलाही दावा करता येणार नाही.

12.नियुक्ती दिलेल्या उमेदारांनी सोलापूर मुख्यालयी राहुन सेवा देणे बंधनकारक राहील.

13.मुलाखत होणार नसल्याने तसेच पदभरतीबाबत उमेदवारांनी कार्यलयात प्रत्यक्ष भेटू नये.

14.अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ईमेल आयडी अचुक नोंदवावा.

15.भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्यांची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल.

16.भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार तसेच पदे कमी जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, इ. सर्व अधिकार आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहेत.

sd-
(पि.शिवशंकर,भा.प्र.से.)
**आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका**

स्थळ प्रतीवर
माननीयांची स्वाक्षरी आहे

**(जमीर लेंगरेकर)**
**उपायुक्त**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.**

## सोलापूर महानगरपालिका.सोलापूर

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्र. :-

फोटो

प्रति,

मा.आयुक्त
सोलापूर महानगरपालिका,

विषय :- पदाचे नांव :- ---------------------------------------------- पद क्र. ----- या पदाकरीता अर्ज

१) उमेदवाराचे संपूर्ण नांव :- ---------------------------------------------------------------------------

२) जन्म तारीख :- वर्ष ----------- महिना ---------- दिवस
अक्षरी -----------------------------------------------------------------------------
वय :- -------- वर्ष पुर्ण ---------- महिने---------दिवस (जाहिरात प्रसिध्द झाली त्या दिवशी)

३) राहण्याचा संपूर्ण पत्ता :- --------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------
मोबाईल क्रमांक :- (नमूद करणे अनिवार्य)
ई-मेल ID ------------------------------------

४) शैक्षणिक अर्हता :-

| धारण करीत असलेली पदवी | बोर्ड/विदयापिठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

५) अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी-

१) २)
३) ४)
५) ६)
७) ८)

वर नमूद केलेला तपशील खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे मी असे हो प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातीमधील सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :-

स्वाक्षरी-

दिनांक :- /०३/२०२१

अर्जदाराचे नांव :-